संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
उपलब्ध सुविधा
डॉ.सौ. चैताली सत्रेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सत्रेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ६४ वा ● ● शनिवार दि. ३० सप्टेंबर २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# बाजार समितीच्या वतीने माती परीक्षण केंद्र सुरु करणार

## तानाजीराव पाटील : आटपाडी बाजार समितीची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/धिरज प्रक्षाळे :** शेतकऱ्यांना माती परीक्षण सहज करता येणे ही आजच्या काळाची गरज झाली आहे. त्यामुळे आटपाडी येथे माती परीक्षण केंद्र झाले पाहिजे यासाठी, आटपाडी बाजार समितीच्या वतीने सभापती, उपसभापती यांनी यासाठीचा प्रस्ताव तातडीने पाठवावा एक महिन्याच्या आता त्याला मंजुरी मिळवून देण्याचे आश्वासन सांगली जिल्हा बँकेचे संचालक तानाजीराव पाटील यांनी दिले. ते आटपाडी बाजार समितीच्या सर्वसाधारण वार्षिक सभेमध्ये बोलत होते.

यावेळी आटपाडी तालुक्याचे युवा नेते दत्तात्रय पाटील (पंच), सभापती संतोष पुजारी, उपसभापती राहुल गायकवाड, संचालक सुबराव पाटील, सुनील तळे, दादासो हुबाले, शरद काळेल यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, आटपाडी बाजार समितीमध्ये जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील दोन-ते तीन बाजार समित्या ओलांडून या ठिकाणी शेतकरी आपला माल विक्रीस आणत यामुळे बाजार समितीचा कारभार योग्य चालला आहे. त्याचबरोबर बाजार समितीच्या वतीने निर्यातक्षम पिकासाठी जी तपासणी करण्यात येते त्यासाठी लागणारी प्रयोगशाळा उभा करता येईल? याची माहिती घेवून ती आटपाडीमध्ये उभा करण्यासाठी प्रयत्न करावा असे नमूद करत, वार्षिक सभेमध्ये सभासदांनी मांडलेल्या सुचनांचे पालक करण्यात येईल असे आश्वासन दिले. राज्यातील सरकार आपले असून मुख्यमंत्री आपला आहे, पस्तीस टक्के मंत्रीमंडळ आपले आहे त्यामुळे बाजार समितीच्या विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नसल्याचे आवर्जून नमूद केले.



आटपाडी : जिल्हा बँकेचे संचालक तानाजीराव पाटील यांचा सत्कार करताना सभापती संतोष पुजारी, उपसभापती राहुल गायकवाड व उपस्थित मान्यवर

आमदार अनिलभाऊ बाबर, जिल्हा बँकेचे संचालक तानाजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समिती ही जिल्ह्यात अव्वल आणून अशी ग्वाही देत, येणाऱ्या कालावधीत बाजार समितीच्या विविध विकास कामांचा धडाका असाच चालू राहणार असून काँग्रेसचे तालुकाध्यक्ष जयदीपभैय्या भोसले व रासपचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण सरगर यांचेही याकामी मार्गदर्शन मिळत असल्याचे सभापती संतोष पुजारी म्हणाले.

प्रस्तावना करताना उपसभापती राहुल गायकवाड यांनी बाजार समितीची संपूर्ण माहिती सांगत, आगामी काळात राबविणाऱ्या योजनांची माहिती दिली. तर सचिव शशिकांत जाधव यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले.तर जयदीप भोसले यांनी ही आपले विचार यावेळी मांडले.

यावेळी बाजार समितीच्या वतीने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या व स्मार्ट व्हिलेज मध्ये तालुकास्तरीय क्रमांक मिळविलेल्या यपावाडी ग्रामपंचायत, गावांतर्गत वृक्षारोपण राबविणाऱ्या घरनिकी ग्रामपंचायत व गावातील नागरिकांना पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या निंबवडे ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक यांना ट्रॉफी व सन्मानपत्र देवून त्यांचा गौरव केला. तर सोयायटी मध्ये शंभर टक्के वसुली करणाऱ्या अनुक्रमे धावडवाडी विकास सोसायटी, यशवंत विजय विकास सोसायटी माळेवाडी व घरनिकी विकास सोसायटी यांचा देखील ट्रॉफी व सन्मानपत्र देवून त्यांचा गौरव केला.

याच बरोबर बाजार समितीचे आडतदाराकडे जास्तीत जास्त माल घालणाऱ्या प्रत्येकी तीन शेतकऱ्यांच्या देखील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राजेवाडी येथील राहुल शिरकांडे यांनी माती पाणी परीक्षण केंद्र होवून शेतकरी वर्गाला मोफत माती परीक्षण करून द्यावे अशी मागणी केली तर, तळेवाडीचे माजी सरपंच जगन्नाथ सरगर यांनी बाजार समितीकडून शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे कापसाचे बियाणे मिळण्याची मागणी केली. आटपाडी ग्रामपंचायतीचे माजी सदस्य बाळासाहेब मेटकरी यांनी आठवडी बाजारात महिला साठी स्वच्छता गृह बांधावे, बाजार समितीच्या वतीने मोठ्या जनावरांचा बाजार सुरु करण्यात यावा अशी मागणी केली.तळेवाडी येथील विकास दगडु सरगर याची बीएसएफ निवड झाल्याबद्दल त्याचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सभेचे सूत्रसंचालन प्रशांत माळी यांनी केले. सभेला मोठ्या प्रमाणत शेतकरी, सभासद उपस्थित होते.

# पारेकरवाडीत ग्रामपंचायत आपल्या दारी अभियान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील पारेकरवाडी येथे लोकनियुक्त सरपंच सुवर्णा कोकरे यांच्या संकल्पनेतून ग्रामपंचायत आपल्या दारी अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत गावातील सर्व कुटुंबांचा सर्व्हे करण्यात आला. या सर्व्हेक्षणातून सर्व कौटुंबिक माहिती संकलित करण्यात आली.



आटपाडी : पारेकरवाडी येथे ग्रामपंचायत आपल्या दारी अभियान राबविण्यात येत असून यातून घरोघरी जावून माहिती संकलित करताना ग्रामपंचायतीचे पदाधिकारी

या सर्व्हेतील माहितीनुसार प्रशासकीय, आरोग्य, शैक्षणिक, शेती विषयक, लघू उद्योग संबंधित शिबीर आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच या सर्व्हेच्या माध्यमातून केंद्र सरकार, राज्य सरकार व ग्रामपंचायतच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभार्थ्यास थेट लाभ देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. या माध्यमातून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी मदत होणार आहे. यासाठी उपसरपंच मयुरी पारेकर, सदस्या आक्काताई डोंबाळे, सदस्या सविता हांडे, सदस्या मनिषा बरकडे, सदस्य संतोष माने, सदस्य सत्यवान बरकडे, सदस्य सुरेश बाबर व ग्रामसेवक सतीश जाधव यांचे सहकार्य लाभले.

# जयंत पाटील, अजित पवारांच्या बालेकिल्ल्यात

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ही अजित पवारांच्या या बालेकिल्ल्यात जातीने लक्ष घातले आहे. गणेशोत्सवानिमित्त त्यांनी बुधवारी रात्री उशिरा अचानक शहराचा दौरा केला. त्यात सध्या तटस्थ असलेल्या माजी महापौर आणि पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या मंगला कदम यांच्यासह भाजपचे माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. गणेश दर्शनानिमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये आलेल्या पाटलांनी राष्ट्रवादीसह भाजपच्या नेत्यांची भेट घेतल्याने चर्चा सुरू झाली आहे.



पुणे : पिंपरी-चिंचवड येथील गणेश मंडळाना भेटी देताना जयंत पाटील

जयंत पाटील यांनी अजितदादांना मॅनेज होणार नाही, असा शहराध्यक्ष तुषार कामठे या भाजपच्या माजी तरुण नगरसेवकाच्या रूपाने दिला. त्यानंतर शहरात पक्षबांधणीची जबाबदारी रोहित पवार या आपल्या अभ्यासू आमदारावर सोपवली. त्याजोडीने तेही स्वतः लक्ष घालत आहेत. शहरात एक मध्यवर्ती कार्यालय करण्याऐवजी त्यासह पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशी विधानसभा मतदारसंघनिहाय कार्यालये असणार आहेत. कार्यालयांच्या उदघाटनांवेळी ते जाहीर सभा घेणार आहेत. त्यावेळी अनेकांची घरवापसी होण्याची शक्यता आहे.

# प्रणव गुरव यांची भाजप युवा मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी फेरनिवड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** भारतीय जनता पक्षाच्या आटपाडी तालुका युवा मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी दिघंची ग्रामपंचायतीचे सदस्य व प्रणव गुरव यांची फेरनिवड करण्यात आली आहे.

प्रणव गुरव हे दिघंची ग्रामपंचायतीचे सलग दुसऱ्या वेळी निवडून आलेले सदस्य आहेत. यापूर्वी त्यांनी पक्षाच्या युवा मोर्चाची जबाबदारी पार पाडली आहे. पक्षामध्ये काम करत असताना त्यांनी पक्षाची ध्येय, धोरणे, पक्षाकडून राबविण्यात येणारे उपक्रम याची माहिती तळागाळातील नागरिकांना विविध माध्यमातून पोहचविण्याचे काम केले असून पक्षाचा विस्तार केला आहे.



आटपाडी : भाजप युवा मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी निवडीचे पत्र देताना खास. संजयकाका पाटील, अमरसिंह देशमुख, ब्रम्हदेव पडळकर, जयवंत सरगर व उपस्थित मान्यवर

त्याच बरोबर त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम देखील राबविले असून त्याची दखल पक्षाच्या वरिष्ठ नेत्यानी घेतली असून त्यामुळे आटपाडी तालुका युवा मोर्चाच्या तालुकाध्यक्ष पदी त्यांनी फेर निवड करण्यात आली आहे. खासदार संजयकाका पाटील, भाजप खानापूर विधानसभा प्रमुख अमरसिंह देशमुख, माजी समाजकल्याण सभापती ब्रम्हानंद पडळकर, माजी सभापती हर्षवर्धन देशमुख, भाजप तालुका अध्यक्ष जयवंत सरगर यांच्या शुभहस्ते त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. त्यांच्या या निवडीमुळे समाजातील विविध घटकाकडून त्यांचे अभिनंदन होत असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# जेलमध्ये असताना भुजबळ पवारांना ब्लॅकमेल करायचे : रमेश कदम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पंढरपूर :** जामिनावर सुटल्यानंतर माजी आमदार रमेश कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते छगन भुजबळ यांच्याबाबत मोठा गौप्यस्फोट केला आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. छगन भुजबळ जेलमध्ये असताना लवकर जामीन मिळावा, यासाठी शरद पवारांना ब्लॅकमेल करायचे, असा मोठा गौप्यस्फोट रमेश कदम यांनी केला आहे.

पंढरपुरात ते पत्रकारांशी बोलत होते. अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळात भ्रष्टाचार केल्याप्रकरणी कदम जेलमध्ये होते. ते सध्या जामिनावर बाहेर आहेत.

रमेश कदम म्हणाले, जेलमध्ये असताना छगन भुजबळ हे नाराजी बोलून दाखवत होते. माझा जामीन लवकर झाला नाही तर मला वेगळा मार्ग स्वीकारावा लागेल,असे सांगत होते. तुरुंगात असल्यावर छगन भुजबळ हे रोजच आजारी पडत होते. त्यांना रोजच उपचाराची गरज होती. पण आता छगन भुजबळ हे चांगलेच फिट आहेत, जेलमध्ये गेल्यावरच ते आठ दिवसांतच आजारी पडले. छातीत दुखतंय ही कारण दाखवून जामिनासाठी नेत्यांची, पक्षांची सहानुभूती मिळवायचे. परंतु आता ते फिट दिसतात, असा टोला रमेश कदमांनी लगावला आहे.

भुजबळ जेव्हा तुरुंगात होते.तेव्हा त्यांच्याशी माझी भेट होत असे. त्यावेळी भुजबळ हे पवार साहेबांनी मला मदत केली पाहिजे. जामिनाला खूपच उशीर होत आहे, असे म्हणत माझ्याजवळ नाराजीदेखील बोलून दाखवायचे, असे कदम म्हणाले.




# कवठेमहांकाळ आगाराच्या व्यवस्थापकांवर कारवाई करा : आ.जयंत पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** तासगाव तालुक्यातील मनेराजुरी, योगेवाडी या परिसरातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना वेळेवर बस मिळत नाही. त्यामुळे त्यांची गैरसोय होत आहे. विद्यार्थ्यांनी बससाठी अनेकवेळा रास्ता रोकोही केला आहे. मात्र तासगाव आणि कवठेमहांकाळ आगाराच्या कारभारात सुधारणा झाली नाही. यापुढील काळात मणेराजुरीच्या विद्यार्थ्यांची गैरसोय होता कामा नये. ती खपवून घेतली जाणार नाही, अशा शब्दात माजी पालकमंत्री आमदार जयंत पाटील यांनी विभाग नियंत्रक सुनील भोकरे यांना खडसावले. शिवाय लोकप्रतिनिधींबद्दल अनुद्गार काढणाऱ्या कवठेमहांकाळ आगाराच्या व्यवस्थापक अश्विनी किरगत यांच्यावर कारवाई करा, अशीही सूचना आमदार पाटील यांनी भोकरे यांना दिली.

तालुक्यातील मणेराजुरी, योगेवाडी या भागातील शेकडो विद्यार्थी दररोज महाविद्यालयीन शिक्षणासाठी तासगाव येथे येत असतात. या विद्यार्थ्यांना कवठेमहांकाळ आगाराच्या बसमधून यावे लागते. मात्र गेल्या काही महिन्यांपासून तासगाव आणि कवठेमहांकाळ आगाराचे वेळापत्रक पूर्णपणे कोलडले आहे. विद्यार्थ्यांना एकही बस वेळेत मिळत नाही. एखादी बस आली तर ती फुल्ल भरून येते. परिणामी विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. दोन-दोन तीन-तीन तास बस स्थानकावर वाट पाहूनही बस मिळत नसल्याने विद्यार्थी आक्रमक झाले आहेत.



तासगाव : कवठेमहांकाळ आगाराच्या व्यवस्थापकांवर कारवाई करावी अशी मागणी आ.जयंत पाटील यांनी विभाग नियंत्रक सुनील भोकरे यांच्याकडे केली. यावेळी उपस्थित मान्यवर

विद्यार्थ्यांनी बससाठी यापूर्वी अनेक वेळा रास्ता रोकोचे हत्यार उपसले आहे. पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलनही केले आहे. शिवाय कवठेमहांकाळ आगाराने आमची फसवणूक केली आहे, अशा आशयाच्या सुमारे ८१ तक्रारी तासगाव पोलिसांकडे दाखल केल्या आहेत. या प्रकरणात माजी पालकमंत्री, आमदार जयंत पाटील यांनी आता लक्ष घातले आहे. बुधवारी आमदार पाटील यांनी विभाग नियंत्रक सुनील भोकरे यांची भेट घेतली. मनेराजुरी, योगीवाडी या भागातून शेकडो विद्यार्थी दररोज तासगावला येत असतात. मात्र तासगाव आणि कवठेमहांकाळ आगाराकडून या विद्यार्थ्यांना वेळेवर बस सेवा उपलब्ध करून दिली जात नाही, याबद्दल आमदार पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. यापुढील काळात विद्यार्थ्यांची गैरसोय झाली नाही पाहिजे, अशा सक्त सूचना दिल्या. यावेळी भोकरे यांनी गणपतीसाठी जिल्ह्यातून सुमारे २०० बसेस पाठवण्यात आल्या आहेत. त्यामुळे काही प्रमाणात गैरसोयी झाल्याचे मान्य केले. मात्र यापुढील काळात विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, याबाबत दक्षता घेऊ असे सांगितले.यावेळी सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सुरेश पाटील, तासगाव बाजार समितीचे संचालक रामचंद्र उर्फ खंडू पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य सतीश पवार, माजी पंचायत समिती सभापती संजय पाटील उपस्थित होते.

# संपादकिय

## 'हरित क्रांतीचे जनक' एम.एस.स्वामीनाथन

१९६० च्या दशकात भारतात आलेल्या हरित क्रांतीचे जनक मानले गेलेले ज्येष्ठ शेतीतज्ज्ञ व सुप्रसिद्ध वैज्ञानिक एम. एस. स्वामीनाथन यांचे काल गुरुवारी निधन झाले ते ९८ वर्षांचे होते. देशातील अल्प उत्पन्न गटातील शेतकऱ्यांसाठी तांदळाच्या विविध प्रकारच्या उच्च उत्पादन देणाऱ्या प्रजाती तयार करण्यातही त्यांनी मोलाची भूमिका बजावली होती. त्यांच्या नोकरीच्या काळात त्यांनी प्रशासनात अनेक महत्त्वाच्या पदांवर आपल्या कामगिरीचा ठसा उमटवला होता. २००४ साली स्वामीनाथन यांना राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही नियुक्त करण्यात आले होतं.

एम.एस.स्वामीनाथन यांनी १९६१ ते १९७२ या ११ वर्षांच्या काळात भारतीय कृषी संशोधन संस्थेचे संचालक म्हणून काम पाहिले. १९७२ ते १९७९ या काळात ते आयसीएआरचे महासंचालक आणि केंद्रीय कृषीय विभागाचे सचिव म्हणून काम पाहात होते. पुढच्याच वर्षी त्यांची कृषी खात्याचे सचिव म्हणून नियुक्ती झाली. १९८० ते ८२ या तीन वर्षांत त्यांनी नियोजन आयोगाचे उपसंचालक आणि त्यानंतर सदस्य म्हणून कार्यभार सांभाळला. १९८२ ते ८८ या ७ वर्षांत त्यांनी इंटरनॅशनल राईस रिसर्च इन्स्टिट्युटचे महासंचालक म्हणूनही काम केले.

२००४ साली वाढत्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय शेतकरी आयोगाच्या अध्यक्षपदी स्वामीनाथन यांची नियुक्त करण्यात आली. स्वामीनाथन आयोगाने २००६ साली त्यांचा सविस्तर अहवाल केंद्र सरकारला सादर केला. या अहवालात, शेतकऱ्यांना त्यांच्या मालासाठी मिळणारा हमीभाव हा मालाच्या उत्पादनाच्या खर्चाच्या किमान दुप्पट असावा अशी शिफारस स्वामीनाथन आयोगाने केली होती.

एम.एस.स्वामीनाथन यांचा १९८७ साली पहिल्या विश्व अन्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यानंतर स्वामीनाथन यांनी चेन्नईमध्ये एम.एस.स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनची स्थापनाही केली होती.

एम.एस.स्वामीनाथन यांना पद्मश्री, पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्याशिवाय एच.के.फिरोदिया पुरस्कार, लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय पुरस्कार, इंदिरा गांधी पुरस्कारानेही त्यांचा गौरव करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त त्यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार (१९७१) व अल्बर्ट आईनस्टाईन वर्ल्ड सायन्स अवॉर्ड (१९८६) हे दोन आंतरराष्ट्रीय स्तरावरचे मानाचे पुरस्कारही मिळाले होते अशा या भारताला हरीत क्रांती बनविणाऱ्या एम.एस.स्वामीनाथन यान भावपूर्ण आदरांजली!

## सचिन वाझे याला जामीन मंजूर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


**मुंबई :** सचिन वाझेला सीबीआय तपास करत असलेल्या खंडणी प्रकरणात जामीन मंजूर झाला आहे. बिमल अग्रवाल नावाच्या व्यापाऱ्याच्या तक्रारीवरून वाझे आणि इतर विरोधात दाखल करण्यात आला होता. काल सत्र न्यायालयात जामीन मंजूर झाला असला तरी वाझे तुरुंगातच राहणार आहे.

व्यापारी विमल अग्रवाल यांनी केलेल्या तक्रारी मध्ये आरोप केला होता की, कोविड काळात वाझे आणि काही लोकांनी हॉटेल चालवण्यासाठी त्यांच्याकडून खंडणी मागितली होती. या प्रकरणी दाखल एफआयआर मध्ये तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंग, गुंड रियाज भाटी, सचिन वाजे, सुमित सिंग आणि अल्पेश पटेल यांचा समावेश आहे. या खंडणी प्रकरणी सचिन वाझे , सुमित सिंग आणि अल्पेश पटेल यांना अटक करण्यात आली होती. मात्र, परमबीर सिंग, रियाझ भाटी यांना अटक करण्यात आली नाही. काही दिवसांपूर्वी सुमित सिंग आणि अल्पेश पटेल यांना जामीन मिळाला होता.

काल सचिन सचिन वाझेला २ लाखांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला आहे. सचिन वाझेवर एकूण चार गुन्हे दाखल असून दोन प्रकरणांचा तपास सीबीआयकडे, एका प्रकरणाचा तपास ईडीकडून तर अँटिलिया समोर स्फोटक आणि मनसुख हत्या प्रकरणाचा तपास एनआयएकडून केला जात आहे. सचिन वाजे यांना दोन प्रकरणांमध्ये जामीन मिळाली आहे. तर एका प्रकरणात वाझे माफीचा साक्षीदार आहे. मात्र एनआयए कोर्टाने वाझेचा जामीन अर्ज नुकताच फेटाळला आहे.




## रमेश बिधुडींची विशेषाधिकार समिती करणार चौकशी



रमेश बिधुडी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** भाजपचे खासदार रमेश बिधुडी यांनी लोकसभेत बोलताना बसपचे खासदार दानिश अली यांच्याबाबत आक्षेपार्ह शब्द वापरले होते. त्यानंतर बिधुडी यांच्यावर विरोधकांनी जोरदार निशाणा साधला होता. मात्र, आता रमेश बिधुडी यांनी लोकसभेत केलेले वादग्रस्त वक्तव्य त्यांना भोवण्याची चिन्ह आहेत. कारण खासदार दानिश अली यांच्याविरोधात आक्षेपार्ह शब्द वापरलेल्या प्रकरणाची आता लोकसभेची समिती चौकशी करणार आहे. त्यामुळे रमेश बिधुरी यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वीच संसदेचे विशेष अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात 'चांद्रयान-३ मिशन'संदर्भात रमेश बिधुरी लोकसभेत बोलत होते. त्यावेळी रमेश बिधुरी यांनी खासदार दानिश अली यांच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी केली. त्यांनी वापरलेल्या आक्षेपार्ह शब्दांमुळे राजकारण चांगलच तापलं होतं. त्यानंतर दानिश अली हेदेखील चांगलेच आक्रमक झाले होते. त्यांनी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहून कारवाई करण्याची मागणी केली होती. तसेच रमेश बिधुरी यांच्यावर कारवाई न झाल्यास आपण खासदारकीचा राजीनामा देणार असल्याचेही दानिश अली म्हणाले होते. यानंतर लोकसभेच्या कामकाजातून रमेश बिधुडी यांचे वक्तव्य काढून टाकण्यात आले होते. पण याविरोधात विरोधी पक्षांनी आक्रमक भूमिका घेतल्यामुळे केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी रमेश बिधुडी यांच्या वादग्रस्त वक्तव्या प्रकरणी माफी मागितली होती. मात्र, तरीही रमेश बिधुडी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी विरोधकांनी लावून धरली. त्यामुळे आता रमेश बिधुडी यांच्या वादग्रस्त वक्तव्याची लोकसभेची समिती चौकशी करणार आहे.

## मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणार नाही



**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांनी मराठा मराठवाड्यातील मराठा समाजाच्या नागरिकांना सरसकट कुणबी जात प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी केली आहे. या मागणीवरुन अनेक घडामोडी घडल्या. ज्यांच्या जुन्या कागदपत्रांमध्ये कुणबी असा उल्लेख असेल त्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय सरकारने घेतला. तसेच सरकारने निजामकालीन कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक समितीदेखील स्थापन केलीय. या समितीने काही लाख अभिलेखांची पडताळणी केली. यामध्ये फक्त ५ हजार कागदपत्रांमध्ये कुणबी असा उल्लेख आढळला आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी सर्व मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी ५ हजार कागदपत्रांचे पुरावे पुरेसे असल्याचे म्हणाले आहेत. त्यांनी सरकारला लवकरात लवकर मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावं, असं म्हटलं आहे. जरांगे यांच्या या मागणीला ओबीसी समाजाच्या नेत्यांचा विरोध आहे. मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र दिलं तर ओबीसी समाजाच्या आरक्षणात त्यांचा वाटा निर्माण होईल. त्यामुळे ओबीसी समाजावर अन्याय होईल, असं ओबीसी नेत्यांचं म्हणणं आहे. त्यामुळे ओबीसी संघटनांचं राज्यभरात आंदोलन सुरु आहे. ओबीसी समाजाच्या नेत्यांची आज राज्य सरकारसोबत सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, छगन भुजबळ उपस्थित होते. या बैठकीत मराठा समाजाला सकसकट कुणबी प्रमाणपत्र देणार नाही, असा शब्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याची माहिती ओबीसी नेत्यांनी दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणार नाही अशी माहिती ओबीसी नेत्यांना दिली. बिहारमधील जातीय जनगणनेच्या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्रातही जनगणना करण्यावर अभ्यास करणार असल्याचं सांगण्यात आलं. तसेच चंद्रपुरात ओबीसी तरुणाचं उपोषण सुरु आहे. या तरुणाचं उपोषण सोडवण्यासाठी स्वत: उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जाणार आहेत. याबाबत बैठकीत माहिती देण्यात आली. त्यामुळे ओबीसी महासंघाने आजचा चंद्रपूर बंदचं आंदोलन मागे घेतले असून यावेळी मुख्यमंत्र्यांनी मराठा आरक्षणाला धक्का लावणार नसल्याचं आश्वासन दिले आहे.

## सांगलीत विसर्जन मिरवणूक मार्गावर व्यक्तीचा संशयास्पद मृत्यू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सांगलीत डॉल्बीच्या दणदणाटामुळे सोमवारी दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच गुरुवारी गणेश चतुर्थीच्या विसर्जन मिरवणुकीमध्ये आणखी एका व्यक्तीचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. मृत व्यक्तीच्या मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. ओळख सुद्धा पटलेली नाही. मात्र, या व्यक्तीचा हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मिरजेतील गणेश विसर्जन मिरवणूक मार्गावर गुरुवारी रात्री एका व्यक्तीचा मृतदेह सापडला. या व्यक्तीचा मृत्यू संशयास्पद आहे. डॉल्बीच्या दणदणाटामध्येच मिरवणूक पार पडली. त्यामुळे या दणदणाटामध्येच त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, संबंधित व्यक्तीचा मृतदेह सापडल्यानंतर मिरज पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. राज्यात अनेक ठिकाणी डॉल्बीच्या दणदणाटात मृत्युमुखी पडल्याच्या घटना दोन दिवसापासून होत आहेत. सांगली जिल्ह्यामध्ये दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन तरुणांचा मृत्यू झाला होता. तासगाव तालुक्यातील कवठेएकंदमधील शेखर पावशे (वय ३२, रा. कवठेएकंद) आणि वाळवा तालुक्यातील दुधारीमधील प्रवीण शिरतोडे (वय ३५ रा. दुधारी) या तरुणांवर मृत्यू ओढवला होता. मिरवणुकीतील डीजेच्या दणदणाटाने अस्वस्थ वाटू लागल्यानंतर दोघांचा मृत्यू झाला.




## माझ्यावरील आरोप स्पॉन्सर्ड : ब्रिजभूषण सिंह



ब्रिजभूषण सिंह

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी खासदार ब्रिजभूषण चरण सिंह यांच्याविरोधात गुन्हा दाखल होऊन पोलिसांनी आरोपत्र दाखल केले आहे. याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. परंतु, माझ्यावर पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले असले तरीही माझ्यावर कोणतीही केस सुरू नसल्याचं ब्रिजभूषण चरण सिंग यांनी स्पष्ट केलं. एएनआय या वृत्तसंस्थेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. ब्रिजभूषण चरण सिंह म्हणाले, हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. न्यायालयीन प्रक्रियेवर आम्ही टिप्पणी करू शकत नाही. जे न्यायालयापेक्षा मोठे आहेत ते टिप्पणी करू शकतात. माझ्यावर आरोपपत्र दाखल झाले नाहीत. पोलिसांनी माझ्यावर आरोपपत्र दाखल केलं आहे, त्या आरोपपत्राला मी आव्हान दिलं आहे. त्यामुळे माझ्यावर केस सुरू नाही. आरोपपत्र पोलिसांनी दाखल केलं असून त्याला मी आव्हान दिलं आहे.न्यायालयात काय सांगायचं ते मी न्यायालयात सांगेन. कारण मीडिया ट्रायल करण्यात काही अर्थ नाही. ब्रिजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप झाले, ते स्पॉन्सर्ड होते, असा दावाही त्यांनी केला. यावेळी हे आरोप कोणी स्पॉन्सर्ड केले त्यांची नावेही त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, दीपेंदर हुड्डा, भुपेंदर हुड्डा आणि काही उद्योगपतीही आहेत. काही लोकांच्या पोटात दुखायचं ज्यांना मनमानी पद्धतीने कुस्तीला चालवायचं असायचं. परंतु, मी कोणाचंही ऐकलं नाही. मी फक्त कुस्तीची पूजा करतो. जग या गोष्टीला मान्य करेल की आम्ही कुस्तीवर मनापासून प्रेम केलंय. दरम्यान, दीपेंदर हुड्डा हे काँग्रेसचे खासदार असून भुपेंदर हुडा हे काँग्रेसचे आमदार आहेत.

## 'बारामती ॲग्रो' प्रकरणी हायकोर्टाचा दिलासा

माणदेश एक्सप्रेस न्युज

मुंबई : मुंबई हायकोर्टाने 'बारामती ॲग्रो' या कंपनीवरील कारवाईला स्थगिती दिल्यानंतर रोहित पवार यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कारवाईस स्थगिती दिल्याबद्दल पवार यांनी हायकोर्टाचे आभार मानले. तोडफोड करून मिळवलेल्या सत्तेच्या छत्राखाली राहून सुडाचं राजकारण करणं सोपं आहे, ते करणाऱ्यांनी करत रहावं. त्यांच्यावर सूड कसा उगवायचा याचा निर्णय निवडणुकीत जनता घेईल, असेही रोहित पवार यांनी म्हटले.

आमदार रोहित पवार यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गुरुवारी मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास बारामती ॲग्रो कंपनीचे दोन प्लांट बंद करण्याची नोटीस बजावली होती. या नोटिशीचे पडसाद राजकीय वर्तुळातही उमटले होते. आपल्याविरोधात सूडाची कारवाई सुरू असून दोन मोठ्या नेत्यांच्या इशाऱ्यावर कारवाई झाली असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला होता.

रोहित पवार यांनी ट्वीट करत म्हटले की, 'बारामती ग्रॉ' च्या प्लांटवर कारवाई करण्यास स्थगिती दिल्याबद्दल मी सर्वप्रथम मा. हाय कोर्टाचे आभार मानतो. तोडफोड करून मिळवलेल्या सत्तेच्या छत्राखाली राहून सुडाचं राजकारण करणं सोपं आहे, ते करणाऱ्यांनी करत रहावं. त्यांच्यावर सूड कसा उगवायचा याचा निर्णय निवडणुकीत जनता घेईल. पण यानिमित्ताने माझं त्यांना एक सांगणं आहे की, महाराष्ट्रात कधीही नव्हता तो राजकीय द्वेषाचा घाणेरडा पायंडा तुम्ही पाडताय. एका अर्थाने राजकीय द्वेषाचे बाप तुम्ही आहात, पण लोकशाहीत सामान्य जनता ही बाप असते, हे विसरू नका. त्यामुळं आज जरी तुम्ही खुशीत असलात तरी भविष्यात हेच अस्र तुमच्यावरही उलटल्याशिवाय राहणार नाही.




दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)






# अजितदादा महायुतीमध्ये आल्याने भाजपला फरक पडत नाही : अजय कुमार मिश्रा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सातारा :** उपमुख्यमंत्री अजित पवार महायुतीमध्ये सामील झाल्यामुळे भाजपला काहीही फरक पडणार नाही. राज्यात भाजप हाच सर्वात मोठा पक्ष आहे ते महायुतीत आल्यामुळे प्रादेशिक स्वरूपाच्या छोट्या-मोठ्या पक्षांना फरक पडेल असे उपरोधीकपणे साताऱ्याचे संपर्क प्रभारी व केंद्रीय गृहराज्यमंत्री अजय कुमार मिश्रा साताऱ्यात म्हणाले.

केंद्रीय गृहराज्यमंत्री अजय कुमार मिश्रा साताऱ्याच्या भाजपा संपर्क अभियानावर होते. यावेळी खासदार उदयनराजे भोसले, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, सातारा जिल्ह्याचे प्रभारी अमर साबळे, अतुल भोसले, मनोज घोरपडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, शहराध्यक्ष विकास गोसावी उपस्थित होते.



**सातारा : येथे पत्रकार परिषदेमध्ये बोलताना केंद्रीय मंत्री अजय कुमार मिश्रा, खासदार उदयनराजे भोसले व उपस्थित मान्यवर**

भाजपा हा राज्यातील एकमेव सर्वात मोठा पक्ष आहे.पक्षाचे १८ कोटी सदस्य आहेत. पक्षाची ध्येय धोरणे आणि संघटनात्मक कामे वरिष्ठ केंद्रीय कार्यकारणीच्या माध्यमातून योग्य पद्धतीने सुरू आहेत असे सांगून अजय कुमार मिश्रा म्हणाले,महाराष्ट्रामध्ये आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खासदारकीच्या सर्व ४८ जागा निवडून आणणार आहे. त्याकरिता भाजपची संघटनात्मक बांधणी अत्यंत योग्य पद्धतीने सुरू आहे. याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला आरक्षण, विश्वकर्मा योजना या विविध विकास योजनांच्या माध्यमातून देशाला एका वेगळ्या पातळीवर नेले आहे असे मिश्रा म्हणाले.

# दिल्लीतून चोरलेल्या कारवर सांगलीचा क्रमांक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** वाहन चोरल्यानंतर मालकासह पोलिसांच्या डोळ्यांत धूळफेक करण्यासाठी त्यावर बनावट नोंदणी क्रमांक (नंबरप्लेट) दिला जातो. अशा वाहनांनी वाहतुकीचे नियम मोडल्यास या बनावट नोंदणी क्रमांकाआधारे वाहतूक पोलिसांकडून चलान दिले जाते. वाहन चोरीला गेले असले तरी चलन मूळ मालकाला मिळते. असाच प्रकार अमरावतीत घडला आहे. दिल्ली येथून चोरलेल्या कारवर शहरातील दोन भामट्यांनी बनावट वाहन क्रमांक टाकला. त्यानंतर त्या कारचा शहरात सर्रास वापर सुरू केला. दरम्यान, त्या कारला शहर वाहतूक शाखेने तब्बल सहावेळा ई-चलानने दंड ठोठावला. या कारवाईतून दिल्लीवरून चोरलेल्या कारवर सांगलीच्या वाहनाचा क्रमांक असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.

विजय लालचंद त्रिकोटी (३९) रा. रामपुरी कॅम्प व राहुल शेळके रा. अकोली रोड, साईनगर अशी आरोपींची नावे आहेत. चारचाकी वाहन क्रमांक एमएच १४ एफएक्स २९६२ हे सांगली सोडून कुठेही फिरले नसताना, कुठेही प्रवास केला नसताना त्या वाहनास वेग नियमनाच्या उल्लघंनाबाबत ई-चलान प्राप्त होतात, अशी तक्रार शहर वाहतूक शाखेत कार्यरत पोलीस हवालदार संतोष तिवारी प्राप्त झाली.

या वाहनास एकूण सहा ई-चलानने दंड आकारण्यात आला. ते सर्व चलान वाहनाचे मूळ मालक के.डी.सन्नोळी (रा. सांगली) यांना गेले. आपले वाहन सांगली सोडून कुठेही गेले नसताना अमरावती शहर व ग्रामीण पोलिसांकडून ई-चलान कसे? असा प्रश्न त्यांना पडला. तर, दुसरीकडे सहा वेळा चलान दिल्याने ते वाहन जप्त करण्याचे आदेश वाहतूक शाखेच्या सहायक पोलीस आयुक्तांनी दिले. त्या अनुषंगाने शहर वाहतूक शाखेने मूळ मालक के.डी.सन्नोळी यांचा अर्ज, सोबतच्या दस्तऐवजाची तपासणीसुद्धा केली. तसेच प्रादेशिक परिवहन विभागासोबतसुद्धा संपर्क करण्यात आला.

अमरावतीमध्ये ते वाहन कोण चालवितो, तेदेखील तपासण्यात आले. तपासाअंती विजय त्रिकोटी व त्याचा मित्र राहुल शेळके यांनी दिल्ली येथून एक चारचाकी वाहन चोरले. त्या कारचा मूळ क्रमांक डीएल ८ सीएएम ७५३४ हा होता. ती ओळख मिटविण्यासाठी त्या वाहनावर सन्नोळी यांच्या वाहनाचा क्रमांक टाकला असल्याचे तपासात उजेडात आले.

# रोहित पवार यांच्या कंपनीवर कारवाई

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्या कंपनीवर बुधवारी मध्यरात्री कारवाई झाली. या कारवाईची माहिती स्वत: रोहित पवार यांनी दिली. रोहित पवार यांनी या कारवाई संदर्भात दोन राजकीय नेत्यांचा उल्लेख केला आहे. नाव न घेता त्यांनी या राजकीय नेत्यांमुळे ही कारवाई झाली असल्याचे म्हटले आहे. दरम्यान, मध्यरात्री झालेल्या या कारवाईमुळे राजकीय क्षेत्रात आश्चर्य व्यक्त होत आहे.

आमदार रोहित पवार यांची बारामती ग्रो ही कंपनी आहे. या कंपनीच्या बारामती येथील प्लॅन्टवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळाने कारवाई केली. प्रदूषण मंडळाकडून रात्री २ वाजता आमदार रोहित पवार यांना नोटीस देण्यात आली आहे. या नोटिशीत बारामती ग्रो या कंपनीचा प्लॅन्ट ७२ तासांत बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.



**रोहित पवार**

आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर या कारवाईची माहिती दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे की, दोन मोठ्या नेत्यांच्या सांगण्यावरून ही कारवाई झाली आहे. द्वेष मनात ठेवून एका शासकीय विभागाच्या माध्यमातून माझ्या कंपनीवर पहाटे दोन वाजता कारवाई झाली. एखादी भूमिका घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, हे माझ्या युवा मित्रांना सांगू इच्छितो. मी घेतलेल्या भूमिकेमुळे ही कारवाई होत आहे. परंतु अशा काही अडचणी आल्या तर मी संघर्ष थांबवेल, असे नाही. मराठी माणसाचे वैशिष्ट म्हणजे ते भूमिका बदल नाही. माझ्या लढा सुरुच राहणार आहे.

रोहित पवार यांचा २९ सप्टेंबर रोजी वाढदिवस आहे. त्याचा एक दिवस आधी ही कारवाई झाली आहे. त्यावर रोहित पवार यांनी म्हटले आहे की, माझ्या वाढदिवसानिमित्त 'गिफ्ट' दिल्याबद्दल सरकारचे आभार मानतो. आता जनता सरकारला 'रिटर्न गिफ्ट' देणार, याची मला खात्री आहे.

# भारताला अन्नधान्यात आत्मनिर्भर करणारा महान शास्त्रज्ञ हरपला : देवेंद्र फडणवीस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** भारताच्या हरित क्रांतीचे जनक ज्येष्ठ शेतीतज्ज्ञ व सुप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या निधनाने भारताला अन्नधान्यात आत्मनिर्भर करणारा महान शास्त्रज्ञ हरपला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस आपल्या संदेशात म्हणतात, देशातील अल्प उत्पन्न गटातील शेतकऱ्यांसाठी तांदळाच्या विविध प्रकारच्या उच्च उत्पादन देणाऱ्या प्रजाती तयार करण्यातही त्यांनी मोलाची भूमिका बजावली होती. प्रशासनात अनेक महत्त्वाच्या पदांवर काम करतानाही त्यांनी शेतकरी हित जपण्याचे महत्त्वाचे कार्य केले. २००४ साली स्वामीनाथन यांनी राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही केलेले कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आहे. २००६ मध्ये किमान आधारभूत किंमत (एमएसपी) बाबत त्यांनी काही शिफारसी केल्या होत्या, उत्पादन मूल्याच्या दीड पट हमीभाव देण्याच्या त्यांच्या शिफारसींची अंमलबजावणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१८ मध्ये केली. डॉ. स्वामीनाथन यांच्या निधनाने नव्या पिढीचा मार्गदर्शक हरपला आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. हे दु:ख सहन करण्याची ताकद त्यांच्या कुटुंबियांना लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना!
















# हिंदी भाषा हीच राष्ट्रभाषेची हक्कदार : प्राचार्य प्रा.डॉ.सुरेश पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जत :** देशात हिंदी भाषेला अधिक चालना मिळावी म्हणून संपूर्ण देशात १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिवस साजरा केला जातो. भारत हा वैविध्यपूर्ण देश असून देशातील ७७ टक्के लोक हिंदी भाषा बोलतात व लिहितात. हिंदी ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने हिंदी भाषा ही राष्ट्रभाषेची हक्कदार आहे, असे प्रतिपादन राजे रामराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांनी केले.

ते राजे रामराव महाविद्यालय जत, येथे हिंदी विभागाच्या वतीने आयोजित हिंदी सप्ताह समारोपाच्या निमित्ताने आयोजित ग्रंथप्रदर्शन व पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभागप्रमुख प्रा.एच.डी.टोंगारे हे होते.

यावेळी अध्यक्षस्थानावरुन बोलताना प्रा. एच.डी.टोंगारे म्हणाले की, हिंदी भाषेला स्वातंत्र्य लढ्याचा गौरवशाली वारसा लाभलेला असून हिंदी भाषेने देशाला एकत्र जोडून ठेवण्याचे काम केलेले आहे, असे सांगून त्यांनी हिंदी विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा - भित्तीपत्रिका, गीतगायन, शेरो-शायरी व गजल, वक्तृत्व, निबंध, हस्ताक्षर, काव्यवाचन इत्यादी स्पर्धेत बक्षीस मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.




जत : हिंदी दिन समारोप व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ.सुरेश पाटील व उपस्थित प्राध्यापक वृंद, विद्यार्थी

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश पाटील यांच्या हस्ते व हिंदी विभागप्रमुख प्रा.एच. डी.टोंगारे, ग्रंथपाल प्रा.अभयकुमार पाटील, डॉ.सतीशकुमार पडोळकर, प्रा.लता करांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन संपन्न झाले. हिंदी सप्ताहा निमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.सुवर्णा सावंत हिने तर प्रास्ताविक कु.सानिका लवटे यांनी केले. शेवटी आभार कु.ऋतुजा शिंदे हिने मानले. कार्यक्रमासाठी ग्रंथालय स्टाफ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अर्जुनवाड ते मिरज रोड वरील रेल्वे गेट ३ ऑक्टोबरपासून वाहतूकीस बंद

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** मिरज येथील अर्जुनवाड ते मिरज रोड वरील रेल्वे गेट डउ ४६५ वरून होणारी वाहतूक पुलाच्या कामकाजास्तव ३ ऑक्टोबरपासून एक महिन्यासाठी अन्य मार्गाने वळविण्यात आल्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी जारी केले आहेत.

अतिरिक्त महाव्यवस्थापक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपमेंट कॉर्पोरेशन लि., मुंबई यांच्या विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी मोटर वाहन कायदा १९८८ कलम ११५ व ११६ अन्वये मिरज येथील अर्जुनवाड ते मिरज रोड वरील रेल्वे गेट डउ ४६५ वरून होणारी वाहतूक दि. ३ ऑक्टोबर २०२३ ते २ नोव्हेंबर २०२३ या कालावधीसाठी अन्य मार्गांवरून वळविण्यात येत असल्याची अधिसूचना जारी केली असून वाहतुक सुरक्षा उपाययोजनेद्वारे वाहतुक नियंत्रीत करण्याचे आदेश निर्गमीत केले आहेत.

या आदेशानुसार मिरज शहरातुन कृष्णा घाट अर्जुनवाडकडे जाणाऱ्या वाहनांसाठीचा मार्ग - शास्त्री चौक- म्हैशाळ रोड/ बेडग रोड ओव्हर ब्रिजवरुन- म्हैशाळ रोड - रत्नागिरी- नागपुर जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्याच्या ब्रिजखालुन पश्चिमेस (उजवीकडे) वळण घेऊन राष्ट्रीय महामार्गाच्या सर्व्हिस रोडने जाऊन परत कृष्णा घाट अर्जुनवाड शिरोळ रोडकडे जाता येईल. तर कृष्णा घाट अर्जुनवाड, शिरोळकडुन मिरज शहरात येणाऱ्या वाहनांसाठीचा मार्ग - कृष्णा घाट - अर्जुनवाड रोड - नागपुर - रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गाच्या ब्रिजखालुन पुर्वेकडील बाजुस (उजवीकडे) वळण घेऊन सर्व्हिस रोडने पुढे जाऊन म्हैशाळ रोडवर डावे बाजुस उत्तरेकडे वळण घेऊन म्हैशाळ/बेडगकडे जाणाऱ्या ओव्हर ब्रिजवरुन- शास्त्री चौक मिरजकडे येता येईल. (तसाच परत उलटा प्रवास).

अर्जुनवाड ते मिरज रोड वरील रेल्वे गेट डउ ४६५ वरून होणारी वाहतूक अन्य मार्गाने वळविण्यात आल्याने अतिरिक्त महाव्यवस्थापक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपमेंट कॉर्पोरेशन लि., मुंबई यांनी जनतेच्या व वाहन चालकांच्या माहितीसाठी योग्य ठिकाणी दिशाचिन्हे व माहिती लावावी. या उपाययोजना कार्यकारी अभियंता, मध्य रेल्वे, मिरज, पोलीस अधीक्षक सांगली, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सांगली, वाहतूक नियंत्रण शाखा सांगली व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज यांनी एकत्रितपणे कराव्यात.

अतिरिक्त महाव्यवस्थापक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपमेंट कॉर्पोरेशन लि., मुंबई यांनी रेल्वे गेट डउ ४६५ वरून होणारी वाहतूक प्रतिबंध केल्याबाबतची माहिती जनतेला होण्यासाठी ग्रामीण व शहरातील सार्वजनिक वाहतूक ठिकाणी अधिसूचना तसेच वाहतूकीसाठी उपलब्ध पर्यायी मार्गाच्या माहितीस व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी, असेही जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी आदेशात नमूद केले आहे.

# विद्यालये बंद करा व मद्यालये सुरू करा !

## गतिमान सरकारचा वेगवान निर्णयाने शिक्षणाचा खेळ खंडोबा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नाझरे/वार्ताहर :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी वाडेवस्त्यांवर शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या तरतुदीप्रमाणे मोफत शाळा सुरू केल्या व यासाठी प्रत्येक बालकाच्या घरापासून एक किलोमीटर अंतराच्या आत प्राथमिक शाळा व तीन किलोमीटर अंतराच्या आत उच्च प्राथमिक शाळेचे बंधनकारक असताना महाराष्ट्र सरकारने पटसंख्येचे कारण देत १४ हजार शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला असून हा निर्णय सामाजिक दरी निर्माण करणारा आहे.

याउलट १९७३ पासून नवीन दारू दुकाने परवाने बंद असताना आता दारू दुकाने उघडण्यास मुभा दिली आहे. यामुळे गतिमान सध्या सरकारने वेगवान निर्णय घेत विद्यालये बंद करा व मद्यालये सुरू करा असाच निर्णय घेतल्याने शिक्षक पालक विद्यार्थी शिक्षक संघटना नाराजी व्यक्त केली असून शिक्षणाचा खेळ खंडोबा करणाऱ्या सरकारचा येत्या निवडणुकीत खेळखंडोबा झाल्याशिवाय राहणार नाही असे सर्वत्र बोलले जात आहे. समूह शाळा धोरणा विरोधात सर्वत्र टीकेची झोड उठली असून शिक्षकाचाही आक्रोश सुरू झालेला आहे. हा आत्मघातकी निर्णय बदला व शिक्षणाचा चाललेला खेळ खंडोबा थांबवा अशी मागणी सर्वत्र होत आहे.

खेडेपाडे वाड्या वस्त्या तांड्यांवरील सहा वर्ष ते १४ वर्षापर्यंतच्या मुला मुलींचा मानसिकतेचा विचार न करता दूर अंतरावर समूह शाळा भरवल्यानंतर बाल मनावर आघात होणार आहे व याचा फटका ग्रामीण भागातील शिक्षणाला बसणार आहे. आज ग्रामीण भागात सर्वत्र रस्ते पक्की नाहीत व बिन खर्चिक मुले शाळेत येत असताना शिक्षण विभागाने 'आईजीच्या जीवावर बाईची उधार' हे धोरण राबवू नये. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ व भौगोलिक परिस्थिती बघता सरकार जवळपास लाख दीड लाख सुमारे विद्यार्थ्यांना गावात शिकू द्यायचे सोडून इतरच विस्थापित करीत आहे.

शिक्षण ही भांडवली गुंतवणूक आहे. याचे मूल्य पैशात मोजता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन सरकारने कमी पटसंख्येच्या शाळा बंद न करता त्या शाळांमध्ये शौचालय पिण्याचे पाणी स्वच्छ जागा वीज व संगणकीय उपकरणे इंटरनेट खेळाची व करमणुकीची साधने उपलब्ध करून देऊन मग पटसंख्या का वाढत नाही याचा विचार करावा. यासाठी पायाभूत सुविधा द्या व समूह शाळा निर्णय घेऊन वाढत चाललेली सामाजिक दरी दूर करून शिक्षणाचा खेळ खंडोबा थांबवावा अशी मागणी सर्वत्र होत आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे हा बालकाचा मूलभूत हक्क आहे यासाठी प्रशिक्षित शिक्षक असणे गरजेचे असताना गेल्या दहा ते बारा वर्षांपासून शिक्षक भरती नाही व आज जागतिक स्पर्धेला सामोरे जाताना पुरेशी शिक्षक संख्या नाही ही लाजिरवाणी बाब आहे व यातच खाजगी कंपन्या द्वारे शिक्षक भरती करून शासन निर्णय व शासकीय नोकरीसाठी आस लावून बसलेले हजारो पात्रता धारकांचे स्वप्न चक्काचूर करणारा आहे व शिक्षणासह सर्वच क्षेत्रात कंत्राटीकरण हा निर्णय चिंताजनक असून यास विद्यार्थी पालक व राजकीय क्षेत्रातून ही विरोध होऊ लागला आहे.

सर्वांना समान मोफत गुणवत्तापूर्ण शिक्षण या तरतुदीला छेद जात आहे. शिक्षण हे सर्व सेवा क्षेत्र असून ते नफा कमवण्याचे साधन नाही. पवित्र ज्ञानदानाच्या क्षेत्रात खाजगी कंपन्यांकडून शिक्षक भरती व त्यांना अर्धकुशल व अकुशल कामगारापेक्षा कमी वेतन देणे व यामुळे सार्वजनिक शिक्षण व्यवस्था मोडीत निघणार आहे. यासाठी सरकारने शिक्षणातील कंत्राटीकरण कायमचे बंद करून शिक्षकांची १००% पदे पूर्ण वेळ भरणे गरजेचे आहे. व यासाठी विद्यार्थी आज मंत्रालयाच्या जाळीवर उड्या घेताना दिसत आहेत. यासाठी त्यांना न्याय देणे सरकारचे काम आहे व योग्य निर्णय न झाल्यास उड्यांचा परिणाम उद्याच्या निवडणुकीवर निश्चित होणार? असे विद्यार्थी शिक्षक व पालक वर्गात बोलले जात आहे.













